# Bharatiya Janata Party

**C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 400 020. Tel: 22022050**

डॉ. किरीट सोमैय्या यानी २२.१०.०७ रोजी पत्रकार परिषदेत प्रसिद्ध केलेले पत्रक

ऑक्टोबर २२, २००७

## गहू आयात घोटाळा
## सरकार सीबीआय चौकशीला कां घाबरते?

भारत सरकारचे आणि महाराष्ट्र सरकारचे त्यांच्या अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयांवर नियंत्रण राहिलेले नाही काय? ते देशाची दिशाभाल करीत आहेत काय? माजी खासदार आणि भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यानी सडक्या दूषित लाल गव्हाच्या वितरणाबाबत हे प्रश्न विचारले आहेत.

शनिवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी डॉ. किरीट सोमैय्या यानी सिंधुदुर्ग येथील भाजप कार्यकर्त्यांबरोबर जिल्ह्यातील बांदा येथील शिधावाटप दुकानाला भेट दिली. त्यानी बांदा कंन्झ्युमर्स सोसायटीच्या दुकान क्र. १ मध्ये चालू असलेली भयानक आयात लाल गव्हाची विक्री आपल्या डोळ्यानी पाहिली. गहू पूर्णपणे दूषित आहे. डॉ. किरीट सोमैय्या यानी दुकानदार श्री विनायक येडवे यांच्या समक्ष सडक्या गव्हाचे पाच नमुने मोहरबंद केले, पंचनाम्यावर बांद्याचे सरपंच श्री अशोक सावंत यानी सही केली.

डॉ. सोमैय्या यानी भाजप प्रवक्ते श्री माधव भंडानी यांच्यासमवेत सावंतवाडी येथील सरकारी गोदामालाहि भेट दिली आणि त्याना गोदामात पडून असलेली सडक्या आयात लाल गव्हाची शेकडो पोती आढळून आली. गोदाम प्रतिपालक श्री नार्वेकर यानी अशी माहिती दिली कि हा सडका दूषित गहू सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिधावाटप दुकानातून अंत्योदय आणि अन्नपूर्णा अशा विविध बीपीएल योजनाना पुरविला जातो.

मोहरबंद केलेले ५ नमुने गोदाम प्रतिपालक श्री नार्वेकर यांच्या समक्ष सरकारी गोदामातून प्राप्त करण्यात आले आणि पंचनाम्यावर स्थानिक लोकांच्या सह्या सही घेण्यात आल्या.

ह्या गव्हाचे मोहरबंद केलेले नमुने श्री शरद पवार यांच्या दिल्ली येथील कार्यालयाला सादर करण्यात आले आहेत. भाजपने असेच शिधावाटप दुकानातील आणि सरकारी गोदामातील मोहरबंद नमुने महाराष्ट्राच्या अन्न आणि नागरी पुरवठा मंत्र्याना सादर केले आहेत. हे नमुने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगातर्फे २६ ऑक्टोबर, २००७ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या सभापतिंच्या कार्यालयात होणाऱ्या सुनावणीच्या वेळी सादर केले जाणार आहेत. मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचिव, नागरी पुरवठा आणि महिला आणि बाल कल्याण विभागाच्या सचिवानाहि आदेश काढले आहेत.

भाजपने म्हटले आहे कि, दूषित आयात लाल गहू आजहि जबरदस्तीने संपूर्ण महाराष्ट्रात विकला जात आहे. ही आश्चर्याची बाब आहे कि केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्र्यानी आणि महाराष्ट्र सरकारने मुंबईच्या शिधावाटप दुकानातून पडून असलेल्या अशा १७०० टन गव्हाची विल्हेवाट लावण्याचा/तो फेकून देण्याचा आदेश दिला आहे. पण त्याचवेळी महाराष्ट्रात आलेल्या त्याच दर्जाच्या २३००० टन गव्हाची विक्री त्यानी जबरदस्तीने सुरूच ठेवली आहे. खरे तर, ३ जहाजातून आयात झालेला १,००,००० टन गहू भारत सरकारच्या प्रयोगशाळेने "माणसानी खाण्यास अयोग्य" म्हणून जाहीर केला आहे.

भाजपने या प्रश्नावर पंतप्रधानांची भेट मागितली आहे. भाजप या सडक्या गव्हाचे विविध नमुने पंतप्रधानाना सादर करील.

**भाजपने मागणी केली आहे:**

* सडक्या दूषित आयात लाल गव्हाचे वितरण ताबडतोब थांबविण्याचा आदेश
* महाराष्ट्र सरकार आणि एफसीआयच्या विविध गोदामांमध्ये पडून असलेल्या अशा सर्व गव्हाची प्रयोगशाळा चाचणी
* विविध शिधावाटप दुकानात पडून असलेल्या गव्हाची प्रयोगशाळा चाचणी
* बीपीएल खालील गरिब, अन्नपूर्णा योजनेखालील प्रौढ आणइ अनुसूचित जमातीना हा सडका गहू विकणे चालूच ठेवणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध व्यक्तिविरुद्ध कारवाई.

***प्रसिद्धी सचिव***